| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 06 Apr 2026 | 'Total Loss' or 'Return to Invoice'? | Maharashtra Times |

**अपघात किंवा चोरीसारख्या अनपेक्षित घटनांमध्ये वाहन विमा आर्थिक आधार देतो. मात्र 'टोटल लॉस' आणि 'रिटर्न टू इनव्हॉइस' या संकल्पनांमधील फरक अनेकांना स्पष्ट नसतो. या दोन्ही पर्यायांमध्ये भरपाईची पद्धत वेगळी असल्यामुळे अंतिम मिळणारी रक्कमही बदलते. योग्य माहिती असल्यास विमा खरेदी आणि क्लेमच्या वेळी योग्य निर्णय घेणे सोपे जाते.**

# 'टोटल लॉस' की 'रिटर्न टू इनव्हॉइस'?



राकेश कौल
matawealth
@timesofindia.com

चोरी किंवा नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीपासून वाहन मालकांचे संरक्षण करण्यात वाहन विमा महत्त्वाची भूमिका निभावतो. आपल्यापैकी अनेकांना विम्याविषयी मुलभूत माहिती असते. मात्र, 'रिटर्न टू इनव्हॉइस' आणि 'टोटल लॉस' आदी संकल्पनांचा प्रत्यक्ष वापरावेळी गोंधळ उडतो. वरकरणी समान भासणाऱ्या संकल्पनांचा संबंध कारचे दुरुस्तीपलीकडील नुकसान होते किंवा चोरीला जाते तेव्हा येतो. मात्र, दोघांची नुकसान भरपाई निर्धारित करण्याची पद्धत वेगळी आहे. या सर्व बाबींच्या अनुषंगाने नेमका फरक जाणून घेतल्यास विमा खरेदी आणि दाव्याच्या (क्लेम) वेळी योग्य निर्णय घेणे शक्य होते.

## वाहनविम्यातील 'टोटल लॉस'

कार दुरुस्तीचा खर्च सध्याच्या बाजार किमतीपेक्षा अधिक असतो. कार चोरीला गेल्यानंतर पुन्हा ती मिळविणे शक्य नसते, अशा स्थितीत ती 'टोटल लॉस' म्हणून घोषित केली जाते. अशा परिस्थितीत विमा कंपनी कारच्या 'इन्श्युअर्ड डिक्लेअर्ड व्हॅल्यू'एवढी (आयडीव्ही) रक्कम मालकाला भरपाई म्हणून देते. 'आयडीव्ही'ची रक्कम 'डेप्रिसिएशन'मधून (घसारा) वजा केल्यानंतर कारची सध्याची बाजारातील किंमत दर्शवते. कारच्या मूल्यात दर वर्षी घट होत असल्यामुळे 'टोटल लॉस' अंतर्गत मिळणारी रक्कम कारच्या मूळ खरेदी किमतीपेक्षा कमी असते. उदाहरणार्थ, तुम्ही १० लाख रुपयांत कार खरेदी केली आणि तीन वर्षांनंतर कारची 'आयडीव्ही' सहा लाख रुपे असेल. म्हणजेच 'टोटल लॉस' झाल्यावर विमा कंपनी तुम्हाला सहा लाख रुपये देईल. यामध्ये निश्चितपणे भरपाई मिळते. मात्र, समान कार खरेदी करण्यासाठी हवी असलेली पुरेशी रक्कम तुमच्याकडे नसते. कारण घसाऱ्यामुळे 'क्लेम'च्या रकमेत लक्षणीयरीत्या घट होते.

## 'रिटर्न टू इनव्हॉइस' (आरटीआय)

'रिटर्न टू इनव्हॉइस' वाहनविम्यातील 'ॲड-ऑन' संरक्षण असून, 'स्टँडर्ड टोटल लॉस सेटलमेंट'च्या तुलनेत अधिक प्रभावी आर्थिक संरक्षण प्रदान करते. तुमची कार चोरीला जाते किंवा 'टोटल लॉस' घोषित होते, तेव्हा 'इन्श्युरर' तुम्हाला त्याच्या 'डेप्रिसिएटेड मार्केट मूल्या'ऐवजी वाहनाच्या मूळ बिलाइतक्या रकमेचे पेमेंट करतो. या बिलाच्या रकमेत केवळ खरेदी किंमतच नाही, तर रजिस्ट्रेशन शुल्क आणि 'रोड टॅक्स'ही समाविष्ट असतो. त्यामुळे तुम्ही सुरुवातीला खर्च केलेल्या संपूर्ण रकमेची भरपाई मिळण्याची खात्री मिळते. आरटीआय' अनिवार्यपणे 'इन्श्युअर्ड डिक्लेअर्ड व्हॅल्यू' (आयडीव्ही) आणि वास्तविक खरेदी किंमत यातील अंतर भरून काढते. 'डेप्रिसिएशन'मुळे दर वर्षी कारचे मूल्य कमी होते. सामान्यपणे, 'इन्श्युरर'च्या पॉलिसीवर अवलंबून 'आरटीआय' तीन ते पाच वर्षांपर्यंतच्या जुन्या कारसाठी उपलब्ध असतो. उदाहरणार्थ, समजा कारची 'इनव्हॉइस व्हॅल्यू' १० लाख रुपये असल्यास 'आरटीआय' संरक्षणामुळे तीन वर्षांनंतर घटलेल्या सहा लाख रुपयांच्या 'आयडीव्ही'ऐवजी १० लाख रुपांची भरपाई मिळू शकते. यामुळे 'आरटीआय' विशेषतः नवीन किंवा महागड्या कारसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. कारण, 'डेप्रिसिएशन'मुळे मूळ किंमत आणि भरपाई यामध्ये मोठी तफावत निर्माण होऊ शकते; त्यामुळे अतिरिक्त निधीशिवाय नवीन वाहन खरेदी कठीण होते.

## 'आरटीआय', 'टोटल लॉस'ची दावा प्रक्रिया

- **इन्श्युरन्स कंपनीला महिती द्या :** अपघात किंवा चोरीनंतर तत्काळ तुमच्या विमा कंपनीला माहिती द्या. घटनेची तारीख, वेळ, स्वरूप आणि ड्रायव्हरचे तपशील आदींचे तपशील द्या. तत्काळ कळवल्याने पुढील प्रक्रियेसाठी विलंब टळतो.
- **पडताळणी :** नुकसानीचे मूल्यांकन करण्यासाठी कंपनी सर्वेक्षक पाठवेल. दुरुस्तीचा खर्च 'आयडीव्ही'पेक्षा जास्त असेल, तर कार 'टोटल लॉस' म्हणून घोषित केली जाते. चोरीच्या स्थितीत पोलिस तक्रार (एफआयआर) आणि न सापडल्याचा दाखला आवश्यक असतो.
- **कागदपत्रे पूर्तता :** विमा पॉलिसी, क्लेम फॉर्म, रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, ड्रायव्हिंग लायसन्स, 'एफआयआर' (चोरीसाठी) आणि बँक तपशील आदी आवश्यक कागदपत्रे विमा कंपनीकडे सोपवा. 'आरटीआय' क्लेमसाठी, मूळ इनव्हॉइस कॉपीदेखील आवश्यक असते.

## क्लेम सेटलमेंट

- **'टोटल लॉस' अंतर्गत :** 'डेप्रिसिएशन' कपात केल्यानंतर 'इन्श्युरर' 'आयडीव्ही'चे पेमेंट करतो.
- **'आरटीआय' अंतर्गत :** 'इन्श्युरर रजिस्ट्रेशन' आणि 'रोड टॅक्स' आणि पहिल्या वर्षाच्या पॉलिसी संरक्षणासह संपूर्ण बिल रकमेचे पेमेंट करतो
- **पेमेंट ट्रान्स्फर :** एकदा पडताळणी झाल्यानंतर, 'हायपोथिकेशन'च्या बाबतीत बँकेकडे दाव्याची रक्कम हस्तांतर केली जाते. तुम्ही नवीन वाहन खरेदी करत असाल, तर ती थेट कार वितरकाला दिली जाईल. त्यानंतर 'पे-आउट' आणि कपात (असल्यास) स्पष्ट करणारे सेटलमेंट लेटर जारी केले जाते.

(लेखक 'बजाज जनरल इन्शुरन्स'चे चीफ डिस्ट्रीब्युशन ऑफिसर(रिटेल बिझनेस) आहेत.)